**ठळक बातम्या**

- पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघ अजिंक्य

- जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीत डिजिटल विकासाच्या भारतीय मॉडेलवर आज चर्चा होणार

- अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प आज शपथ घेणार

**आणि**

- इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी आणि ओलिसांच्या सुटका कराराची अंमलबजावणी

**<><><><><>**

भारताच्या महिला आणि पुरुष संघानं पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. काल रात्री झालेल्या दोन्ही सामन्यात भारतीय संघांनी वेग, रणनिती आणि कौशल्याचं उत्तम प्रदर्शन केलं. भारतीय पुरुष संघाने नेपाळला ५४-३६ असं नमवत विश्वचषकावर नाव कोरलं तर महिला संघानं नेपाळच्या महिला संघाला ७८-४० अशी मोठ्या फरकानं मात दिली. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यांमध्ये भारतानं पहिल्यापासूनच निर्विवाद वर्चस्व गाजवलं आणि नेपाळला रोखून धरलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दोन्ही संघांचं अभिनंदन केलं आहे. महिला आणि

पुरुष संघाचा विजय देशाच्या तरुण पिढीला प्रेरणादायक ठरेल असे गौरवोद्गार राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी काढले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही दोन्ही संघांचं कौतुक केलं आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…..

**होल्ड व्हीसी**

*भारतीय पुरुष संघाने संपूर्ण विश्वचषकात शानदार प्रदर्शन केलं. अंतिम सामन्यातही आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर भारतीय पुरुष संघ जगज्जेता ठरला आहे. त्याआधी भारतीय महिला संघानेही अंतिम सामन्यात मोठ्या फरकाने विजय मिळवत पहिल्यावहिल्या विश्वचषकावर नाव कोरलं आहे. या खोखो विश्वचषकाचं वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही विश्वविजेत्या भारतीय संघांचे कर्णधार प्रतीक वाईकर आणि प्रियांका इंगळे हे मराठी आहेत. खेळाडूंप्रमाणे पुरुष संघाचे प्रशिक्षक शिरीन गोडबोले, महिला संघाच्या प्रशिक्षक प्राची वाईकर आणि फिजीओथेरपीस्ट डॉक्टर अमित राहवाटे यांचंही या विजयात मोलाचं योगदान आहे.*

**<><><><><>**

जागतिक आर्थिक मंचाची ५५ वी वार्षिक बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू होत आहे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात सर्वसमावेशक विकास आणि डिजिटल क्रांतीच्या भारतीय मॉडेलविषयी विशेष चर्चा केली जाईल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्यासह भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. भारताच्या प्रभावी आर्थिक विकास दरानं, प्रमुख क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय विकासासह, संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे आणि देशाला जागतिक स्तरावर एक अग्रगण्य स्थान मिळाल्याचं वृत्त आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिलं आहे.

दरम्यान, जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल स्वित्झर्लंडमध्ये दाखल झाले. बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वतीनं तसंच विविध संस्थांच्या वतीने त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीनं लेझीम खेळत, मराठी गौरवगीत सादर केलं. मुख्यमंत्र्यांनी उपस्थित मराठी समूदायाशी मनमोकळा संवाद साधला.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंका यांनी दोन्ही देशांमधील ऊर्जा सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी सामपूर सौर ऊर्जा प्रकल्पातील ऊर्जेसाठी प्रति युनिट किंमत निश्चित केली आहे. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन आणि सिलोन इलेक्ट्रिसिटी बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमानं नुकतेच ५ पूर्णांक ९७ अमेरिकी सेंट प्रति किलोवॅट प्रती तास, अशी किंमत निश्चित करण्यात आली आहे, श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांनी काल एका जाहीर सभेत ही माहिती दिली. अक्षय ऊर्जा क्षेत्रात १३५ मेगा वॅटचा हा प्रकल्प द्विपक्षीय ऊर्जा सहकार्यामध्ये भारताच्या योगदानाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**<><><><><>**

भारतीय संविधानाच्या स्वीकृतीच्या अमृतमहोत्सवानिमित्त टपाल विभाग आज नवी दिल्लीत तीन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करणार आहे. राष्ट्रीय फिलाटेलिक संग्रहालयात होणाऱ्या या महोत्सवात सर्व वयोगटातील अभ्यागतांसाठी विविध उपक्रम असतील. यामध्ये प्रदर्शन, प्रश्नमंजुषा, पोस्टल सफारी आणि पत्रलेखन स्पर्धा यांचा समावेश आहे. संविधानात

नमूद केलेल्या मूल्यांना उजाळा देणं आणि एकता आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना बळकट करणं हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचं दळणवळण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प आज शपथ घेणार आहेत. ते वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांच्या उपस्थितीत राष्ट्रपती पदाची शपथ घेतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता शपथविधी सोहळा सुरू होणार आहे. सत्तेच्या अधिकृत हस्तांतरणाचा भाग म्हणून ट्रम्प उद्घाटन भाषण देखील करतील. जेडी व्हॅन्स अमेरिकेचे उपाध्यक्ष म्हणून शपथ घेतील. शपथविधी सोहळ्याला अनेक परदेशी नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामध्ये अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष जेवियर मिले, इटलीचे प्रधानमंत्री ज्योर्जिया मेलोनी, इक्वाडोरचे अध्यक्ष डॅनियल नोबोआ, एल साल्वाडोरचे अध्यक्ष नायब बुकेले, ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष जैर बोल्सोनारो आणि पोलंडचे माजी प्रधानमंत्री मातेउझ मोराविएक यांचा समावेश आहे. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर भारताचं प्रतिनिधित्व करतील. पाहुण्यांमध्ये टेस्लाचे एलोन मस्क, ॲमेझॉनचे जेफ बेझोस, मेटाचे मार्क झुकरबर्ग, ॲपलचे टिम कुक आणि ओपनएआयचे सॅम ऑल्टमन यांचाही समावेश असेल. शपथ घेण्यापूर्वी, ट्रम्प यांनी काल रात्री वॉशिंग्टन डीसी इथं विजयी रॅलीत समर्थकांना संबोधित केलं.

**<><><><><>**

गाझात हमासच्या कैदेतून सुटलेले पहिले ३ बंधक इस्रायलमध्ये दाखल झाले आहेत. इस्रायल आणि हमास यांच्यात झालेल्या शस्त्रसंधी कराराच्या पहिल्या दिवशी काल इस्रायलच्या तीन महिलांची सुटका करण्यात आली. या महिलांच्या वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडे पाठवण्यात येईल.

इस्रायलनं हमाससोबत झालेल्या शस्त्रसंधी करारानुसार ९० पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली आहे. इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी या सुटकेचं श्रेय बायडन प्रशासन आणि नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या ट्रान्झिशन पथकाला दिलं आहे. हमासनं शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यास प्रत्युत्तर देण्याची तयारी असल्याचा इशारा इस्रायली लष्करानं दिला आहे.

**<><><><><>**

बांगलादेशच्या चिट्टॅगाँग इथल्या सत्र न्यायालयानं या महिन्याच्या २ तारखेला इस्कॉनचे माजी पुजारी चिन्मय कृष्ण दास यांची याचिका फेटाळल्यानंतर बांग्लादेश उच्च न्यायालय आज त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी घेण्याची शक्यता आहे. २५ नोव्हेंबर रोजी हिंदू समाजाच्या वतीनं चिट्टॅगाँग इथं काढलेल्या मोर्चानंतर हिंसा झाली होती. त्यानंतर चिन्मय कृष्ण दास यांना ढाका विमानतळावरून देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. २६ नोव्हेंबरपासून ते तुरुंगात आहेत.

**<><><><><>**

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यामध्ये लाखो भाविकांना सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्न मिळावं यासाठी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणानं कठोर उपाययोजना लागू केल्या आहेत. महाकुंभ क्षेत्रात अन्न विश्लेषकांसह १० फिरत्या अन्न चाचणी प्रयोगशाळा तैनात करण्यात आल्या असून त्यात हॉटेल्स, ढाबे आणि खाद्यपदार्थांच्या छोट्या स्टॉलच्या खाद्यपदार्थांची भेसळ आणि गुणवत्ते संदर्भात तपासणी केली जात आहे. हा मेळावा ५ झोन आणि २५ सेक्टरमध्ये विभागण्यात आला आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील सरकारची मंत्रिमंडळ बैठक आज जम्मूत नागरी सचिवालय इथं होणार आहे. या बैठकीत अर्थ, आरोग्य आणि शिक्षण विभागाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार असून सरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांच्या महागाई भत्त्यात सुधारणा, दंत महाविद्यालयांत त्रिस्तरीय फॅकल्टी स्ट्रक्चर लागू करणं आणि झेलम, बाणगंगा नद्यांच्या संवर्धनासारख्या पर्यावरणविषयक विषयांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

दाट धुक्यामुळे दिल्ली एनसीआर परिसरात दृश्यमानता कमी झाल्यानं अनेक रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दिल्लीकडे जाणाऱ्या १९ गाड्या काही तास उशिरानं धावत असल्याची माहिती रेल्वेनं दिली

आहे. यात नौचंदी एक्स्प्रेस, अयोध्या एक्स्प्रेस, गरीब रथ, गोवा एक्स्प्रेस, पद्मावत एक्स्प्रेस आणि गोंडवाना एक्स्प्रेसचा समावेश आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित दहाव्या अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल सिनेदिग्दर्शिका फराह खान यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या समारोप सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण कैलास पुरस्कार शांतिनिकेतन या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. ऑस्कर विजेते साउंड डिझायनर पद्मश्री रसुल पुकुट्टी, राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय सावळकर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

तामिळनाडूतल्या तुरळक भागासह पुद्दुचेरी आणि कराईकलमध्ये आज वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

//<><><><><>//